ePaper

युद्धाच्या पार्श्वभूमीवर कतारमध्ये गॅस टर्मिनलचा भीषण स्फोट! 13 कामगारांचा मृत्यू



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | मंगळवार, दि. 23 जून 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 3 वरुन...

पहिले आदिवासी कला-कौशल्य केंद्र पिंपरी-चिंचवडमध्ये!

## सर्व बंडखोर खासदारांचा शिंदेंच्या शिवसेनेत जाहीर प्रवेश..!

# ..अखेर शिंदेंकडून ६ वाघांची 'शिकार'

महाईन्यूज । मुंबई

**शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातील सहा खासदारांनी सोमवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत अधिकृत प्रवेश केला. या प्रवेशामुळे राज्याच्या राजकारणात मोठी घडामोड घडली असून शिवसेनेतील राजकीय समीकरणे पुन्हा एकदा बदलल्याची चर्चा सुरू झाली आहे.**



मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे झालेल्या कार्यक्रमात ओमराजे निंबाळकर, संजय जाधव, संजय देशमुख, संजय दिना पाटील, नागेश पाटील आष्टीकर आणि भाऊसाहेब वाकचौरे यांनी शिंदे गटात प्रवेश केला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व खासदारांचे स्वागत करत त्यांच्या मतदारसंघांच्या विकासासाठी राज्य सरकारकडून पूर्ण सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही दिली.


यावेळी बोलताना शिंदे म्हणाले की, शिवसेनेत दाखल झालेल्या सर्व खासदारांचा योग्य सन्मान केला जाईल. केंद्र आणि राज्य शासनाशी संबंधित विकासकामे कोणत्याही कारणाने रखडू दिली जाणार नाहीत. जनतेच्या हितासाठी आणि मतदारसंघांच्या विकासासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या प्रवेशामुळे शिवसेना आणखी भक्कम होईल, असा दावा करत शिंदे यांनी पक्षाने सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्याचे सांगितले. तसेच नव्याने दाखल झालेल्या प्रत्येक खासदाराच्या जनसंपर्काची आणि कार्यशैलीची प्रशंसा करत त्यांच्या माध्यमातून विकासाला अधिक गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

2022 मधील शिवसेनेतील बंडाचा उल्लेख करताना शिंदे म्हणाले की, बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांसाठी आम्ही भूमिका घेतली होती. त्या निर्णयावर जनतेने विश्वास दाखविला असून आगामी काळातही विकासाच्या माध्यमातून जनतेची सेवा करण्यासाठी शिवसेना कार्यरत राहील.

दरम्यान, ठाकरे गटातील सहा खासदारांच्या या प्रवेशामुळे राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापले असून आगामी काळात त्याचे पडसाद राज्याच्या राजकारणात उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### कार्यकर्त्यांना दिला विश्वास



या प्रवेशामुळे शिवसेना अधिक मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त करत शिंदे म्हणाले, "मी दिलेला शब्द नेहमी पाळतो. त्यामुळेच कार्यकर्ते आणि जनता माझ्यावर विश्वास ठेवतात. या सहा खासदारांच्या आगमनामुळे पक्षाची ताकद वाढेल आणि राज्यभर विकासाच्या कामांना अधिक वेग मिळेल." राज्यातील बदलत्या राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटातील सहा खासदारांचा शिंदे गटात झालेला प्रवेश हा आगामी राजकीय घडामोडींच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात असून, त्याचे परिणाम आगामी निवडणुकांमध्येही दिसून येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### खासदारांच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही


नव्या खासदारांचे स्वागत करताना एकनाथ शिंदे म्हणाले की, शिवसेनेच्या परिवारात सहा नवीन खासदार सामील झाले आहेत. त्यांचा योग्य तो सन्मान केला जाईल आणि त्यांच्याकडे कधीही दुर्लक्ष होणार नाही. त्यांनी दाखविलेल्या विश्वासाला तडा जाऊ दिला जाणार नाही. केंद्र सरकारशी संबंधित प्रश्न असोत किंवा राज्यातील विकासकामे, या खासदारांच्या मतदारसंघातील कोणतेही काम रखडू दिले जाणार नाही. प्रत्येक विकासकामाला गती देण्यासाठी राज्य सरकार पूर्ण सहकार्य करेल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

# बेपत्ता मुलीच्या प्रकरणाचा गैरफायदा

## सायबर चोरट्यांकडून वडिलांची फसवणूक, १७ तासांत मुलगी सुरक्षित शोध

**महाईन्यूज । पुणे**

**बेपत्ता झालेल्या अल्पवयीन मुलीच्या प्रकरणाचा गैरफायदा घेत सायबर चोरट्यांनी तिच्या वडिलांकडून १५ हजार रुपयांची खंडणी उकळल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. दरम्यान, कोंढवा पोलिसांनी अवघ्या १७ तासांत मुलीचा शोध घेत तिला झारखंडमधून सुखरूप ताब्यात घेऊन पालकांच्या स्वाधीन केले.**




### व्हॉट्सअॅप पोस्टरचा घेतला गैरफायदा

मुलगी सुरक्षितपणे सापडावी या आशेने कुटुंबीयांकडून सर्व स्तरांवर प्रयत्न सुरू होते. मात्र, पालकांच्या चिंतेचा गैरफायदा घेत सायबर चोरट्यांनी अत्यंत धक्कादायक पद्धतीने फसवणूक केल्याचे समोर आले. मुलगी बेपत्ता झाल्यानंतर तिचा शोध लागावा यासाठी वडिलांनी मुलीचा फोटो आणि माहिती असलेले पोस्टर तयार करून विविध व्हॉट्सअॅप समूहांवर प्रसारित केले होते. ही माहिती सायबर चोरट्यांच्या हाती लागली. त्याचाच गैरफायदा घेत त्यांनी बनावट अपहरणाचा व्हिडिओ तयार करून मुलगी त्यांच्या ताब्यात असल्याचे भासविले आणि भीती दाखवून १५ हजार रुपयांची खंडणी उकळली. या प्रकारामुळे सोशल मीडियावर वैयक्तिक माहिती शेअर करताना अधिक सतर्कता बाळगण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

याप्रकरणी मुलीच्या वडिलांनी कोंढवा पोलिस ठाण्यात अपहरणाची तक्रार दाखल केली होती. फिर्यादी हे मूळचे बिहार येथील असून, कुटुंबासह काकडे वस्ती, कोंढवा येथे वास्तव्यास आहेत. त्यांची १७ वर्षीय मुलगीला अनोळखी व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याचा संशय व्यक्त केला होता.

तक्रार दाखल होताच कोंढवा पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे मुलीचा शोध सुरू केला. याच दरम्यान फिर्यादींच्या मोबाईलवर एका अनोळखी क्रमांकावरून व्हिडिओ कॉल आला व ‘तुमची मुलगी आमच्या ताब्यात आहे,' अशी धमकी देत ५० हजार रुपयांची मागणी करत त्याने मोबाईलवर पैसे पाठविण्यासाठी स्कॅनरही पाठवला.

व्हिडिओ कॉलमध्ये मुलीचे हात-पाय बांधलेले असल्याचे दाखवले होते. त्यामुळे घाबरलेल्या वडिलांनी तीन टप्प्यात प्रत्येकी पाच हजार रुपये असे एकूण १५ हजार रुपये संबंधित खात्यावर पाठविले. दरम्यान, पोलिसांनी सायबर चोरट्याला मुलगी सापडली असून, आजी जवळ असल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतरही सायबर चोरटा फिर्यादींकडे बक्षीस म्हणून पैसे मागत होता.

दरम्यान, पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास करीत पुणे रेल्वे स्थानकावरील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली. त्या वेळी संबंधित मुलगी हावडा (कोलकाता)कडे जाणाऱ्या आझाद हिंद एक्स्प्रेसमध्ये बसल्याचे निष्पन्न झाले. तत्काळ रेल्वे प्रशासनाशी संपर्क साधून गाडीची माहिती घेण्यात आली. रेल्वे टाटानगर (जमशेदपूर, झारखंड) येथे पोहोचणार असल्याचे समजताच तेथील रेल्वे पोलिस आणि टीसी यांच्याशी संपर्क साधण्यात आला.

टाटानगर येथे रेल्वे पोलिसांनी आणि रेल्वे कर्मचाऱ्यांनी मुलीचा शोध घेऊन तिला सुखरूप ताब्यात घेतले. त्यानंतर कोंढवा पोलिसांचे पथक आणि फिर्यादी यांना झारखंडला रवाना करण्यात आले. मुलीला ताब्यात घेऊन तिला पालकांकडे सुपूर्द करण्यात आले. याप्रकरणी बनावट अपहरणाचा व्हिडिओ कॉल करणाऱ्या अज्ञात व्यक्तींविरुद्ध कोंढवा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई वरिष्ठ पोलिस निरीक्षक संतोष खेतमाळस, पोलिस निरीक्षक (गुन्हे) प्रशांत मंडले यांच्या सूचनेनुसार पोलिस उपनिरीक्षक रवींद्र गावडे व त्यांच्या पथकाने केली.

# संशोधनावर अधिक भर द्यावा; पारंपरिक शिक्षण चौकटीबाहेर जाण्याची गरज

**महाईन्यूज । पुणे**

**पारंपरिक शैक्षणिक चौकटीतून बाहेर पडून संशोधन आणि विकासावर लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता आहे. कारण, संशोधन क्षेत्रात आपण आजही मागास असल्याचे मत लीला पूनावाला फाउंडेशनच्या संस्थापक आणि सीओईपीच्या माजी विद्यार्थिनी लिला पूनावाला यांनी व्यक्त केले.**



### सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या प्रगतीचा आढावा

गिते म्हणाले, की १७२ वर्षांची शैक्षणिक परंपरा लाभलेली सीओईपी ही केवळ अभियंते नव्हे, तर नेतृत्व घडविणारी संस्था आहे. या वेळी विद्यापीठाचे कुलगुरू सुनील भिरूड यांनी सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या प्रगतीचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अविनाश सांडीझोड, मोहन खोंड, महेश सिंदगीकर यांनी केले. डॉ. दयाराम सोनवणे यांनी आभार मानले.

सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या पाचव्या स्थापना दिन सोहळ्यात प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. या वेळी सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष विनायक पै, सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू सुनील भिरूड, सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलसचिव प्रा. डॉ. दयाराम सोनवणे आणि नियामक मंडळाचे राज्यपाल नियुक्त सदस्य भरत गीते उपस्थित होते.

पूनावाला म्हणाल्या, की प्राध्यापकांना केवळ तासिका घेण्यात अडकवून न ठेवता संयम ठेवून संशोधनासाठी त्यांना पुरेसा वेळ देणे आवश्यक आहे. चिखली येथे उभारलेले संशोधन आणि विकास केंद्र हे त्या दृष्टीने उचललेले एक आशादायी पाऊल आहे. अलीकडच्या विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी विषयांबरोबर नैतिक मूल्यांचे धडे देण्याची गरज आहे. त्यांची 'पॅकेज' मनोभूमिका बदलण्याची गरज आहे. उद्याचे जबाबदार नागरिक आणि अभियंते घडविण्यासाठी शाळा पातळीवर आणि विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे.

या वेळी विनायक पै म्हणाले, अभियंते हे भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असून, त्यांनी अधिकाधिक संशोधन करण्यावर भर दिला पाहिजे. सीओईपीच्या सर्वांगीण विकासात उद्योग क्षेत्रासह माजी विद्यार्थ्यांचे मोलाचे योगदान आहे.

# भारतातील पहिले आदिवासी कला-कौशल्य केंद्र पिंपरी-चिंचवडमध्ये!

## राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आश्वासन




## आमदार महेश लांडगे यांच्या ७ विविध मागण्यांना “ग्रीन सिग्नल”

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

**भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील अग्रणी क्रांतिवीर चापेकर बंधूंची भूमि पिंपरी-चिंचवडमध्ये आदिवासी व वंचित घटकांतील मुलांसाठी समर्पित कला-कौशल्य-कारागिरीचे केंद्र उभारण्याचा संकल्प आता दृष्टीक्षेपात आला आहे. शहराचे भूषण आणि पद्मश्री गिरीश प्रभुणे यांच्या संकल्पनेतील या केंद्राला जागा उपलब्ध करुन देण्याबाबत राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सकारात्मक भूमिका घेतली आहे. याबाबतचा प्रस्ताव कॅबिनेट मंत्रीमंडळाच्या बैठकीत मंजूर करण्यात येणार आहे.**





> “क्रांतिवीर चापेकर बंधू हे पिंपरी-चिंचवडसह भारताचे भूषण आहे. या राष्ट्रप्रेमी विचारांचे स्मरण होईल आणि भारतातील पहिले आदिवासी कला-कौशल्य-कारागिरीचे केंद्र माझ्या पिंपरी-चिंचवडमध्ये होणार आहे, याचा विशेष अभिमान वाटतो. यासह भोसरी विधानसभा मतदारसंघ आणि शहराच्या विकासाशी संबंधित प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सकारात्मक निर्णय घेतले आहेत. आयआयएम मोशी प्रकल्प, प्राधिकरण मिळकतींचे प्रॉपर्टी कार्ड, नगर भूमापन कार्यक्षेत्र विस्तार, महसूल कार्यालयांची उभारणीचा विषय आता मार्गी लागेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी-चिंचवडच्या शाश्वत विकासासाठी आणि नागरिकांच्या हितासाठी आमचा पाठपुरावा यापुढेही अधिक ताकदीने सुरू राहील.”
>
> - महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

भोसरी विधानसभा मतदारसंघासह पिंपरी-चिंचवड शहरातील महसूल विभागाशी संबंधित विविध प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी आमदार महेश लांडगे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत शहराच्या विकासाशी निगडित ७ महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

या बैठकीला पोलीस आयुक्त श्री. विनयकुमार चौबे, महसूल विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच संबंधित विभागांचे प्रतिनिधी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार महेश लांडगे यांनी मांडलेल्या विविध मागण्यांवर सकारात्मक चर्चा झाली असून, अनेक विषयांवर तातडीने कार्यवाहीचे आदेश देण्यात आले.

भारतातील आदिवासी कला-कौशल्य लूप्त होत आहेत. इंग्रजी शाळांचा प्रभाव वाढलेला असताना, भारतीय संस्कृती, सभ्यता यांचा पुरस्कार आणि प्रचार करणारे केंद्र उभारले जावे. त्यासाठी राज्य शासनाने पुढाकार घ्यावा. यासाठी पिंपरी-चिंचवड शहरात १५ हेक्टर जागा उपलब्ध करण्यात यावी, अशी मागणी क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीने केली होती. यावर पहिल्या टप्प्यात या प्रकल्पासाठी १० हेक्टर जागा आणि दुसऱ्या टप्प्यात ५ हेक्टर जागा उपलब्ध करण्याचे विचाराधीन आहे.

### अप्पर तहसीलदार कार्यालयासाठी हक्काची जागा...

याशिवाय, अपर तहसीलदार पिंपरी-चिंचवड कार्यालयासाठी कायमस्वरूपी जागा उपलब्ध करण्यासाठी जिल्हाधिकारी पुणे यांनी १५ दिवसांत पर्यायी जागेचा शोध घेऊन प्रस्ताव शासनाकडे सादर करावा, असे निर्देशही बैठकीत देण्यात आले. या सर्व विषयांचा सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे शहराच्या विकासाला चालना मिळणार असल्याचे आमदार महेश लांडगे यांनी सांगितले. पिंपरी-चिंचवडकरांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांवर सकारात्मक निर्णय झाल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. “पिंपरी-चिंचवडच्या विकासाशी संबंधित प्रत्येक प्रश्न शासन दरबारी प्रभावीपणे मांडण्याचे काम केले आहे. शहराच्या शाश्वत विकासासाठी आणि नागरिकांच्या सोयीसाठी आवश्यक असलेले सर्व प्रश्न मार्गी लावण्याचा आमचा प्रयत्न कायम राहील,” असे आमदार महेश लांडगे यांनी यावेळी सांगितले.

यामध्ये संकूलाचे बांधकाम आणि ओपन स्पेस असा भव्य प्रकल्प उभारण्यात येणार आहे.

तसेच, या बैठकीत मोशी येथे उभारण्यात येणाऱ्या आयआयएम नागपूरच्या उपशाखेसाठी जागा हस्तांतरणाचा विषय मार्गी लागला. याबाबतचा आदेश सात दिवसांत पारित करण्याचे निर्देश महसूल मंत्र्यांनी दिले. त्यामुळे या महत्त्वाकांक्षी शैक्षणिक प्रकल्पाला गती मिळणार आहे. क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीस आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यासाठी पुनर्प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून राज्य शासनाकडून त्यास मंजुरी देण्याबाबत सकारात्मक भूमिका घेण्यात आली आहे. तसेच प्राधिकरण क्षेत्रातील मिळकतींना प्रॉपर्टी कार्ड देण्याचा दीर्घकालीन प्रश्न सोडवण्यासाठी जमाबंदी आयुक्त आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेने समन्वय साधून सहा महिन्यांत कालबद्ध कार्यक्रम पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले.

### तलाठी, मंडळ अधिकारी कार्यालयाला स्वतंत्र इमारत

भोसरी विधानसभा मतदारसंघातील तलाठी आणि मंडळ अधिकारी कार्यालयांसाठी कायमस्वरूपी इमारती उभारण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला. वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर महसूल सेवांमध्ये होणारा विलंब दूर करण्यासाठी अपर तहसीलदार कार्यालयातील पदभरती आणि पदवाढीसही तत्त्वतः मान्यता देण्यात आली. बोपखेल, डुडूळगाव, चऱ्होली बुद्रुक आणि चौविसावाडी ही गावे नगर भूमापन अधिकारी, पिंपरी-चिंचवड यांच्या कार्यक्षेत्रात समाविष्ट करण्यासाठी प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. प्रस्ताव प्राप्त होताच मंजुरी देण्याचे आश्वासन महसूल मंत्र्यांनी दिले. त्यामुळे नागरिकांना महसूल कामांसाठी पुणे कार्यालयात जाण्याची गरज राहणार नाही.



## भूमिका

**राजकारणात केवळ घोषणा, भाषणे किंवा मोठे प्रकल्प महत्त्वाचे नसतात; त्या प्रकल्पांमागील मानवी संवेदनाही तितक्याच महत्त्वाच्या असतात. उत्तर प्रदेशातील नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या उद्घाटनानिमित्त पहिल्या विमानप्रवासासाठी विमानतळासाठी जमीन दिलेल्या १७२ शेतकऱ्यांना निमंत्रित करण्यात आले, ही घटना त्याचे उत्तम उदाहरण ठरली.**

# भावनांपासून विश्वासापर्यंत... नेतृत्वाची खरी परीक्षा



विकासाच्या प्रक्रियेत सर्वस्व अर्पण करणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मान करण्याचा हा प्रयत्न केवळ प्रतीकात्मक नव्हता, तर शासन आणि नागरिकांमधील विश्वास दृढ करणारा होता.

कोणताही मोठा विकास प्रकल्प उभारण्यासाठी जमीन संपादन हा सर्वांत संवेदनशील विषय असतो. अनेकदा यामुळे संघर्ष, आंदोलन आणि न्यायालयीन लढाया निर्माण होतात. मात्र संवाद, पारदर्शकता आणि परस्पर विश्वासाच्या आधारावर तोडगा काढला, तर विकास आणि नागरिकांचे हित या दोन्ही गोष्टी साध्य होऊ शकतात. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यांना त्यात सहभागी करून घेणे ही लोकाभिमुख प्रशासनाची ओळख मानली जाते.

राजकीय नेतृत्वाचे यश केवळ प्रकल्प उभारण्यात नसते, तर त्या प्रकल्पाशी संबंधित प्रत्येक घटकाला सन्मानाची वागणूक देण्यात असते. विकासाचा लाभ जनतेपर्यंत पोहोचतो, याची जाणीव निर्माण झाली की शासनावरील विश्वास अधिक दृढ होतो. त्यामुळे विकासकामे ही केवळ पायाभूत सुविधा उभारण्यापुरती मर्यादित राहत नाहीत, तर ती सामाजिक बांधिलकीची उदाहरणे ठरतात.

दुसरीकडे, भारतीय राजकारणात पक्षांतराचे वाढते प्रमाण चिंतेचा विषय ठरत आहे. जनतेने विशिष्ट विचारसरणी आणि नेतृत्वावर विश्वास ठेवून दिलेला कौल अनेकदा वैयक्तिक राजकीय समीकरणांमुळे बदलला जातो. त्यामुळे लोकशाहीतील नैतिकतेबाबत प्रश्न निर्माण होतात. मतदारांचा विश्वास टिकवून ठेवणे ही प्रत्येक लोकप्रतिनिधीची जबाबदारी आहे. सत्तेची समीकरणे बदलू शकतात; मात्र सार्वजनिक जीवनातील विश्वासार्हता अबाधित राहणे अधिक महत्त्वाचे असते.

जागतिक पातळीवरही नेतृत्वाची कसोटी सातत्याने लागते. युद्धविराम, शांतता करार आणि आंतरराष्ट्रीय संबंध यामध्ये परस्पर विश्वास हा सर्वांत महत्त्वाचा घटक असतो. करार झाल्यानंतरही संघर्ष सुरू राहिल्यास संवाद आणि मुत्सद्देगिरीचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. आजच्या अस्थिर जागतिक परिस्थितीत संयम, संवाद आणि जबाबदार नेतृत्व हीच खरी गरज आहे.

राजकारण असो, प्रशासन असो किंवा आंतरराष्ट्रीय संबंध— प्रत्येक ठिकाणी विश्वास आणि संवेदनशीलता हीच यशाची गुरुकिल्ली आहे. विकासाच्या योजना तेव्हाच यशस्वी ठरतात, जेव्हा त्यामध्ये माणूस केंद्रस्थानी असतो. नागरिकांचा सन्मान, पारदर्शक निर्णयप्रक्रिया आणि लोकहिताला प्राधान्य देणारे नेतृत्व हे कोणत्याही लोकशाही व्यवस्थेचे खरे बळ आहे. त्यामुळे प्रगतीचा वेग आणि मानवी मूल्ये यांचा समतोल राखणे, हीच आजच्या काळातील सर्वांत मोठी नेतृत्वाची परीक्षा आहे.

## प्रासंगिक »

### जगण्याचे भान

**एक तरुण अतिशय उधळ्या आणि व्यसनाधीन होता. दारू, जुगार आणि मौजमजेत त्याने आपली सर्व संपत्ती उधळली. अखेर तो दरिद्री होऊन जंगलात भटकू लागला. हिवाळ्याच्या एका दिवशी कडक ऊन पडले होते.**

नदीकाठी फिरताना त्याला आंब्याच्या झाडावर बसलेली कोकिळा दिसली. कोकिळा पाहून त्याने उन्हाळा सुरू झाल्याचा चुकीचा अंदाज बांधला. आता उबदार कपड्यांची गरज नाही, असे समजून त्याने कपडे गहाण ठेवले आणि मिळालेल्या पैशांत जुगार खेळला. संध्याकाळी मात्र कडाक्याची थंडी पडली. पुरेसे कपडे नसल्याने तो आजारी पडला. दुसऱ्या दिवशी नदीकाठी गेल्यावर त्याला तीच कोकिळा थंडीने गारठून मृतावस्थेत पडलेली दिसली. तेव्हा त्याला आपल्या मूर्खपणाची जाणीव झाली. दुसऱ्यांच्या आंधळ्या अनुकरणामुळे आणि व्यसनाच्या नादामुळे आपण स्वतःचेच नुकसान करून घेतल्याचे त्याच्या लक्षात आले.

- तात्पर्य : व्यसन माणसाची विचारशक्ती हिरावून घेते. परिस्थितीचे योग्य आकलन न केल्यास स्वतःचाच विनाश ओढवतो.

महाराष्ट्राच्या राजकारणात दोन दशकांपासून चर्चेत असलेल्या पवनराजे निंबाळकर हत्या प्रकरणाचा निकाल अखेर समोर आला. विशेष सीबीआय न्यायालयाने माजी गृहमंत्री पद्मसिंह पाटील यांच्यासह सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली.

# न्याय, राजकारण आणि विश्वासाची परीक्षा



निकाल केवळ एका खटल्याचा शेवट नसून, तपास यंत्रणांची कार्यपद्धती, न्यायव्यवस्था आणि राजकारण यांबाबत अनेक प्रश्न उपस्थित करणारा आहे. कोणत्याही हत्या प्रकरणात न्यायालय पुराव्यांच्या आधारे निर्णय देते. या प्रकरणात माफीच्या साक्षीदाराच्या जबाबातील विसंगती, अनेक साक्षीदार फितूर होणे, तांत्रिक पुराव्यांचा अभाव आणि तपासातील त्रुटी यामुळे न्यायालयाने आरोपींना निर्दोष मुक्त केले. यावरून तपास यंत्रणांनी केवळ आरोप मांडणे पुरेसे नसून, ते न्यायालयात निर्विवाद पुराव्यांसह सिद्ध करणे किती आवश्यक आहे, हे पुन्हा अधोरेखित झाले आहे.

सीबीआयसारख्या केंद्रीय तपास संस्थेकडून अधिक काटेकोर आणि निष्पक्ष तपासाची अपेक्षा असते. विशेषतः राजकीयदृष्ट्या संवेदनशील प्रकरणांमध्ये प्रत्येक पुरावा, प्रत्येक साक्ष आणि प्रत्येक तांत्रिक बाब निर्दोष असणे गरजेचे असते. तपासातील उणिवा केवळ खटल्यावर परिणाम करत नाहीत, तर जनतेच्या न्यायव्यवस्थेवरील विश्वासालाही धक्का देतात. त्यामुळे या प्रकरणातून तपास यंत्रणांनी आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे.

या निकालाचे राजकीय परिणामही दुर्लक्षित करता येणार नाहीत. पवनराजे निंबाळकर यांचे पुत्र आणि खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या पुढील राजकीय भूमिकेकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. बदलत्या राजकीय समीकरणांमध्ये पक्षांतर, सत्तेतील सहभाग आणि मतदारसंघाच्या विकासाची गरज या मुद्द्यांभोवती नवे राजकीय चित्र निर्माण होत आहे. मात्र, कोणताही निर्णय घेताना जनतेच्या विश्वासाला तडा जाणार नाही, याची काळजी घेणे लोकप्रतिनिधींची जबाबदारी आहे.

सीबीआयने या निकालाविरोधात उच्च न्यायालयात अपील करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे या प्रकरणाचा अंतिम निकाल अद्याप लागलेला नाही. मात्र, न्याय मिळविण्याची प्रक्रिया जितकी महत्त्वाची आहे, तितकीच ती विश्वासार्ह आणि पारदर्शक असणेही आवश्यक आहे. न्यायाला विलंब होणे आणि तपासातील त्रुटी यामुळे अनेकदा सत्य धूसर होते.

लोकशाही व्यवस्थेत न्यायालय, तपास यंत्रणा आणि राजकीय व्यवस्था या तिन्ही स्तंभांवर नागरिकांचा विश्वास टिकून राहणे अत्यंत आवश्यक आहे. हा निकाल केवळ एका खटल्याचा शेवट नसून, भविष्यातील तपास अधिक सक्षम, पुराव्याधिष्ठित आणि निष्पक्ष करण्याचा धडा म्हणूनही पाहिला गेला पाहिजे.

## ।। अभंगवाणी ।।



बहुतांच्या आम्ही न मिळो मतासी ।  
कोणी कैसी कैसी भावनेच्या ॥१॥

विचार करितां वांयां जाय काळ ।  
लटिकें तें मूळ फजितीचें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# फडणवीस सरकारचा नवा विक्रम!

## विधिमंडळात तब्बल ९७ हजार ७०६ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर

**महाईन्यूज । मुंबई**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्यातील महायुती सरकारने होऊ द्या खर्च म्हणत राबविलेल्या लाडकी बहीण सारख्या अनेक योजनांमुळे तसेच पायाभूत सुविधा प्रकल्पावरील वाढत्या खर्चामुळे राज्याचे आर्थिक नियोजन कोलमडून पडले आहे. राज्याच्या तिजोरीवर पडणारा ताण दिवसेंदिवस वाढू लागला आहे. त्यामुळे अवघ्या तीन महिन्यात तब्बल ९७ हजार ७०६ कोटींच्या पुरवणी मागण्या मांडण्याची आफत सरकारवर आली आहे.**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधिमंडळात तब्बल ९७ हजार ७०६ कोटींच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. यामध्ये बहुचर्चित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी येण्यासाठी २० हजार कोटी तर स्थानिक स्वराज्य संस्थांतील पायाभूत सुविधासाठी १५ हजार कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

९७,७०६.४० कोटींच्या पुरवणी मागण्या पैकी १३ हजार ८२५ कोटीच्या अनिवार्य तर ६६हजार ५५९ कोटींच्या कार्यक्रमांतर्गत व १७हजार ३२१ कोटींच्या रकमा केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांतर्गत अर्थसहाय्य उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने पुरवणी मागण्या आहेत. एकूण ९७ हजार ७०६.४० कोटींच्या स्थूल पुरवणी मागण्या असल्या तरी त्याचा प्रत्यक्ष निव्वळ भार हा ७४ हजार ८१७.६६ कोटी एवढा आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेसाठी २० हजार ५५२ कोटी, केंद्र शासनाकडून राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजनेंतर्गत बिनव्याजी कर्ज, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने घेतलेले कर्ज व कर्जावरील व्याजाची परतफेड करण्यासाठी १० हजार कोटी,विकसित भारत-जी राम जी (केंद्र व राज्य हिस्सा)७ हजार३६७कोटी, राज्य शासनाच्या कार्यालयांची वीज देयके संयुक्त बिलिंग प्रणालीव्दारे अदा करण्यासाठी३ हजार कोटी, सिंहस्थ कुंभमेळ्याचे नियोजन व अंमलबजावणीसाठी ३ हजार कोटी, राज्यातील कृषिपंप, यंत्रमाग, वस्त्रोद्योग व औद्योगिक ग्राहकांसाठी विद्युत प्रशुल्कात देण्यात येणारी सवलटीपोटी२ हजार ७२२ कोटी, राज्यातील विविध घटकांसाठीच्या शिष्यवृत्ती योजनेसाठी (शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क)२ हजार ३६०कोटी,संजय गांधी निराधार योजनेतील दिव्यांग व सर्वसाधारण घटकाच्या लाभार्थ्यांसाठी अनुदानपोटी१८७४कोटी, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० एक हजार कोटी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास रेवस रेड्डी सागरी महामार्ग प्रकल्पासाठी भाग भांडवली अंशदान एक हजार कोटी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना भाग भांडवली अंशदानपोटी ७७७ कोटी, महानगरपालिका क्षेत्रात मूलभूत सुखसोयी आणि वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी नगरपरिषदांना अनुदान ७७०कोटी, महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना ७४४ कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात आला.

### विधिमंडळ कामकाज गांभीर्याने घ्या


सभागृहातील मंत्र्यांनी अनुपस्थिती अजिबात खपवून घेतली जाणार नाही. एखाद्या मंत्र्यांच्या अनुपस्थितीमुळे सदनाचे कामकाज बंद पडल्याची घटना घडली तर ती सहन केली जाणार नाही. मंत्र्यांच्या सभागृहातील उपस्थितीवर लक्ष ठेवले जाईल. कामकाज संपल्यानंतर बैठका, ब्रिफींग घ्यावे. मात्र कोणत्याही कारणास्तव किंवा अडचणीमुळे विधिमंडळाच्या कामकाजाकडे आणि सभागृहातील उपस्थितीकडे दुर्लक्ष होणार नाही याची सर्व मंत्र्यांनी खबरदारी घ्यावी. यंदा अधिवेशनाच्या अखेरीस कोणत्या मंत्र्यांच्या गैरहजेरीमुळे सभागृहाचा किती वेळ वाया गेला हे पिठासन अधिकाऱ्यांना जाहीर करण्यास सांगण्याचा इशाराही फडणवीस यांनी दिला.

---

# “सातव्या खासदाराचीही सही”, रामदास कदमांच्या विधानाने खळबळ

**महाईन्यूज । मुंबई**

**ओमराजे निंबाळकर, संजय जाधव, संजय देशमुख, संजय पाटील, नागेश आष्टीकर आणि भाऊसाहेब वाकचौरे हे सहा खासदार आज ठाकरेंची साथ सोडून एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत अधिकृतरित्या प्रवेश करणार आहेत. सध्या हे खासदार मुंबईत दाखल झाले असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शासकीय निवासस्थानी नंदनवन येथे पोहोचले आहेत.**





दरम्यान, शिवसेना (एकनाथ शिंदे)पक्षाचे वरिष्ठ नेते रामदास कदम यांनी धक्कादायक खुलासा केला आहे. सहा नाही तर सात खासदारांच्या स्वाक्षरीचं पत्र असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

सुरुवातीला समोर आलं होतं. मात्र, सहा खासदारांचीच नावे समोर आली. आता, रामदास कदम यांनी दिलेल्या माहितीनुसार सहा नव्हे तर सात खासदारांनी स्वाक्षरी केली आहे. याबाबत ते म्हणाले, “उद्धव ठाकरेंच्या बाजूला जे बसत आहेत, ते त्यांना फसवत आहेत. सहा नाही, सातव्या खासदाराचीही सही आहे. हे मी जबाबदारीने बोलतो आहे. त्यांनी मंत्रिपद मागितलं. मंत्रिपद मिळालं नाही म्हणून ते परत गेले आणि आता ते उद्धव ठाकरेंच्या बाजूला बसत आहेत. उद्धव ठाकरेंना माणसांची ओळख नाही.”

“ऑपरेशन टायगर यशस्वी होऊ नये म्हणून काही लोकांनी प्रयत्न केला. ओमराजे निंबाळकर यांना रात्री काही लोकांनी भेटण्याचा प्रयत्न केला. त्यांना पाठवलं गेलं होतं. पण निंबाळकरांनी त्यांना चोख उत्तर दिलं. मला आज एकनाथ शिंदे यांचा खूप अभिमान वाटतोय. कारण, त्यांनी जो निर्णय घेतला त्याची आज अंमलबजावणी होत आहे.

आज चार वाजता यशवंतराव चव्हाण सेंटर येथे सहाही खासदारांचा प्रवेश होणार आहे. कालच एकनाथ शिंदे यांनी सांगितलं होतं की मी कोणतंही ऑपरेशन अर्धवट करत नाही”, असंही रामदास कदम म्हणाले.

### ठाकरे गटाचे आमदार-नगरसेवकही संपर्कात

ठाकरेंच्या शिवसेनेचे सहा खासदार मुंबईत दाखल झाले असून ते आज शिंदेंच्या शिवसेनेत अधिकृत प्रवेश करणार असल्याबाबत शिक्कामोर्तब झालं आहे. यावर रामदास कदम म्हणाले, “ये तो झांकी है, और बहोत कुछ बाकी आहे. आमदार (फुटीच्या मार्गावर) आहेत. मुंबई महानगरपालिकेचे नगरसेवकही संपर्कात आहेत. आता मी नावं सांगणार नाही.

# ब्रिटनचा नवा पंतप्रधान कोण होणार?

## लेबर पक्षात सुरू असलेल्या या अंतर्गत वादळानंतर कीर स्टार्मर यांचा राजीनामा

**महाईन्यूज । लंडन**

**ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. कीर स्टार्मर यांनी राजीनामा दिल्यामुळे आता ब्रिटनच्या नव्या पंतप्रधानांची निवड करण्यासाठी दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया सुरू होणार आहे. ब्रिटनमध्ये पुन्हा सार्वत्रिक निवडणुका न होताच अँडी बर्नहॅम यांची पंतप्रधान पदासाठी निवड होण्याची शक्यता आहे. लेबर पक्षात अंतर्गत वाद वाढत होते. त्यामुळे स्टार्मर यांनी राजीनामा दिला आहे.**



दरम्यान, नवीन पंतप्रधानांची नेमणूक होईपर्यंत स्टार्मर ब्रिटनचे काळजीवाहू पंतप्रधान राहतील. नवीन पंतप्रधान निवडण्यासाठी तसेच नवीन पंतप्रधानांना सरकार स्थापन करण्यासाठी सत्ताधारी लेबर पार्टीला काही कालावधी मिळणे आवश्यक आहे.

ब्रिटनमधील सत्ताधारी लेबर पक्षाचे नेते अँडी बर्नहॅम यांचा मेकरफिल्ड येथे झालेल्या पोटनिवडणुकीत विजय झाला. त्यानंतर ते ब्रिटनच्या संसदेत परतले आहेत. पंतप्रधान पदासाठी बर्नहॅम हे प्रबळ व आघाडीचे दावेदार मानले जात आहेत. परंतु, बर्नहॅम यांना पंतप्रधान बनण्यात काही राजकीय व घटनात्मक अडचणी आहेत. कारण, माजी पंतप्रधान कीर स्टार्मर हे बर्नहॅम यांना उत्तराधिकारी म्हणून घोषित करणार नाहीत. तसेच स्टार्मर यांनी पंतप्रधान पद सोडल्याने नव्या पंतप्रधानांच्या नियुक्तीसाठी ब्रिटनमध्ये पुन्हा निवडणुकाही होणार नाहीत.

ब्रिटनमधील लोक थेट पंतप्रधान पदासाठी मतदान करत नाहीत. ब्रिटनच्या संसदेला 'हाउस ऑफ कॉमन्स' म्हटले जाते. 'हाउस ऑफ कॉमन्स'मध्ये असलेले खासदार जनतेतून निवडून येतात. ब्रिटनच्या संसदेत ज्या पक्षाला बहुमत असते त्या पक्षातील नेता पंतप्रधान बनतो. पक्षातील नेत्यांनाच त्यांच्यापैकी एका नेत्याची पक्षनेता म्हणून निवड करावी लागते. हाच पक्षनेता ब्रिटनचा पंतप्रधान बनतो. २०२४ मध्ये ब्रिटनमध्ये झालेल्या संसदेच्या निवडणुकीत कीर स्टार्मर यांच्या लेबर पक्षाला बहुमत मिळाले आहे. त्यामुळे स्टार्मर यांनी राजीनामा दिला तरी पक्षाच्या बहुमताला कोणताही धक्का लागत नाही. त्यामुळे लेबर पक्षाला आता नव्या नेत्याची पंतप्रधान पदासाठी निवड करावी लागणार आहे. इतर कोणीही पंतप्रधान पदाच्या शर्यतीत सहभागी होऊ नये म्हणून लेबर पक्षातील खासदारांवर जोरदार प्रभाव पाडणे, हा एक पर्याय अँडी बर्नहॅम यांच्याकडे आहे. पंतप्रधानपदाच्या निवडणुकीत उभे राहू इच्छिणाऱ्या नेत्याला सत्ताधारी लेबर पक्षाच्या किमान २० टक्के खासदारांचे समर्थन मिळवणे बंधनकारक आहे.

### पंतप्रधानपदाची लढत बिनविरोध होणार?

लेबर पक्षातून माजी आरोग्य सचिव वेस स्ट्रिटिंग हे पंतप्रधानपदासाठी इच्छुक आहेत. स्ट्रिटिंग यांनी त्यांच्या पदाचा मागील महिन्यात राजीनामा दिला होता. कीर स्टार्मर यांच्या नेतृत्वाला त्यांनी जोरदार विरोध केला होता. आपल्याला पंतप्रधान पदाची निवडणूक लढवण्यासाठी आवश्यक असलेल्या ८१ खासदारांचे समर्थन आहे, असे स्ट्रिटिंग यांनी यापूर्वी म्हटले होते. दरम्यान, पंतप्रधान पदाची निवडणूक बिनविरोध होऊ नये, असे लेबर पक्षातील काही वरिष्ठ खासदारांना वाटते. महिला नेत्यांनी पंतप्रधान पदाच्या शर्यतीत उतरावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

# बोगस एन्काउंटर की स्वसंरक्षण? भरत तिवारीच्या मृत्यूने बिहार हादरले

**महाईन्यूज । बिहार**

**बिहारच्या भोजपूर जिल्ह्यात २८ वर्षीय सामाजिक कार्यकर्ते भरत भूषण तिवारी यांच्या एन्काउंटरवरून सध्या प्रचंड राजकीय गदारोळ माजला आहे. या घटनेनंतर जनतेमध्ये तीव्र संताप असून, सत्ताधारी भाजपमधूनही पोलिसांच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. वाढता वाद आणि लोकांचा आक्रोश पाहता, बिहार सरकारने या प्रकरणाची निवृत्त उच्च न्यायालयीन न्यायाधीशांच्या देखरेखीखाली स्वतंत्र न्यायालयीन चौकशी करण्याचे आदेश दिले.**





स्वसंरक्षणासाठी आणि गावकऱ्यांच्या सुरक्षेसाठी पोलिसांनी प्रत्युत्तरादाखल गोळीबार केला. या चकमकीत भरतच्या पायाला गोळी लागली. त्याला उपचारासाठी पाटणा मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले, जिथे उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. घटनास्थळावरून एक पिस्तूल, जिवंत काडतूस आणि रिकाम्या पुंगळ्या जप्त केल्याचा दावा पोलिसांनी केला आहे.

हा एन्काउंटर संशयाच्या भोवऱ्यात सापडण्याचे मुख्य कारण म्हणजे सोशल मीडियावर व्हायरल झालेले काही व्हिडिओ. या व्हिडिओमध्ये भरत गोळीबारापूर्वी आपली बंदूक फेकून देताना दिसत असल्याचा दावा केला जात आहे. परिस्थिती आणखी संवेदनशीलतेने हाताळता आली असती का, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. याप्रकरणी कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत स्टेशन हाउस ऑफिसर यांच्यासह चार पोलिसांना निलंबित करण्यात आले आहे.

या घटनेमुळे बिहारच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. उपमुख्यमंत्री विजय कुमार सिन्हा यांनी ही घटना अत्यंत दुर्दैवी असल्याचे सांगत प्रशासकीय निष्काळजीपणाकडे बोट दाखवले आहे. शिक्षण मंत्री मिथिलेश तिवारी, ऋतुराज सिन्हा आणि आमदार आनंद मिश्र यांसारख्या भाजप नेत्यांनीही पोलिसांच्या भूमिकेवर तीव्र आक्षेप घेतला आहे. "कायदा आणि सुव्यवस्था राखणे गरजेचे आहे, पण रक्षकानेच भक्षक बनू नये," अशा शब्दांत ऋतुराज सिन्हा यांनी नाराजी व्यक्त केली. तसेच, भोजपुरी गायक पवन सिंह यानेही सोशल मीडिया पोस्टद्वारे या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे. भरतच्या मृत्यूनंतर बिलाउती गावात तीव्र पडसाद उमटले. संतप्त नातेवाईक आणि गावकऱ्यांनी भरतचा मृतदेह आरा-बक्सर महामार्गावर ठेवून रस्ता रोको आंदोलन केले. हे 'फेक एन्काउंटर' असल्याचा आरोप करत दोषी पोलिसांवर कडक कारवाईची मागणी त्यांनी केली आहे. हे प्रकरण आता सर्वोच्च न्यायालयात पोहोचले असून, या प्रकरणाची सीबीआय चौकशी व्हावी आणि संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांवर एफआयआर नोंदवण्यात यावा, अशी मागणी करणारी याचिका दाखल करण्यात आली आहे. न्यायालयीन चौकशीनंतरच या एन्काउंटरमागचे खरे सत्य समोर येईल.

### नेमकी घटना काय आहे?

भरत भूषण तिवारी हा भोजपूर जिल्ह्यातील बिलाउती गावचा रहिवासी होता. स्थानिक लोकांच्या मते, तो सोशल मीडियाच्या माध्यमातून गरीब, पूरग्रस्त आणि विस्थापितांचे प्रश्न मांडणारा एक सामाजिक कार्यकर्ता होता. पोलीस प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, १७ जून रोजी भरत तिवारी गावात बंदूक घेऊन फिरत असून हवेत गोळीबार करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार स्थानिक पोलीस आणि एसटीएफचे पथक घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी भरत याला आत्मसमर्पण करण्यास सांगितले, मात्र त्याने पोलिसांवर गोळीबार सुरूच ठेवला.



# पूजा सावंतच्या 'दृश्य अदृश्य'ने प्रेक्षकांना ठेवलं खिळवून

मराठी चित्रपटसृष्टीत सध्या थरारपटांना प्रेक्षकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. अशातच अभिनेत्री पूजा सावंत आणि अभिनेता अशोक समर्थ यांचा 'दृश्य अदृश्य' हा चित्रपट प्रदर्शित झाला असून, त्याच्या वेगळ्या कथानकामुळे तो चर्चेत आला आहे. कोणताही भव्यदिव्यपणा, मोठे ॲक्शन सीन्स किंवा व्हिज्युअल इफेक्ट्सचा आधार न घेता प्रेक्षकांना शेवटपर्यंत खिळवून ठेवण्याचं काम या चित्रपटाने केलं आहे. या चित्रपटाचं दिग्दर्शन मिलिंद लेले यांनी केलं आहे. अतिशय साध्या पण प्रभावी पद्धतीने त्यांनी एक रहस्यमय कथा पडद्यावर मांडली आहे. 'दृश्य अदृश्य' हे नाव ऐकल्यावर एखादी मानसिक गुंतागुंत असलेली किंवा भास-आभासांवर आधारित कथा असावी असं वाटतं. मात्र, प्रत्यक्षात ही कथा एका आईच्या आयुष्यात अचानक आलेल्या संकटाभोवती फिरते. चित्रपटात पूजा सावंतने तन्वी प्रधान ही व्यक्तिरेखा साकारली आहे. तन्वी सायबर सुरक्षा क्षेत्रात काम करणारी एक तरुणी आहे. तिचा पती कामानिमित्त महाबळेश्वरमध्ये असतो. त्याचा वाढदिवस एकत्र साजरा करण्यासाठी तन्वी तिची लहान मुलगी ईशाला घेऊन महाबळेश्वरमधील एका हॉटेलमध्ये जाते. मात्र, दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यानंतर तिची मुलगी अचानक गायब झाल्याचं तिच्या लक्षात येतं. तन्वी सर्वत्र शोध घेते, पण ईशाचा काहीच पत्ता लागत नाही. यानंतर कथेत मोठं वळण येतं. हॉटेलमधील कर्मचारी तन्वी एकटीच आली होती, तिच्यासोबत कोणतीही मुलगी नव्हती, असा दावा करतात. इतकंच नाही तर तन्वीसोबत मुलगी आली होती, याचा एकही पुरावा तिच्याकडे सापडत नाही. त्यामुळे प्रकरण अधिकच गुंतागुंतीचं होतं.



# जान्हवी कपूरने प्रेमाची दिली हटके कबुली?



बॉलिवूड अभिनेत्री जान्हवी कपूर ही तिच्या अभिनयासोबतच वैयक्तिक आयुष्यामुळेही नेहमी चर्चेत असते. गेल्या काही वर्षांपासून तिचं नाव शिखर पहाडियासोबत जोडलं जात आहे. जरी या दोघांनी त्यांच्या नात्याबद्दल अधिकृत घोषणा केलेली नसली, तरी अनेक सार्वजनिक कार्यक्रम, सोशल मीडिया पोस्ट आणि एकत्र दिसणाऱ्या त्यांच्या उपस्थितीमुळे त्यांच्या नात्याबद्दल सातत्याने चर्चा होत असते. आता पुन्हा एकदा जान्हवी कपूर तिच्या एका खास लूकमुळे चर्चेत आली आहे. यावेळी तिच्या कपड्यांवरील एका मजेशीर संदेशाने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. तिचा हा फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून चाहते त्यावर भरभरून प्रतिक्रिया देत आहेत. अलीकडेच एका इन्स्टाग्राम पेजवर जान्हवीचा एक फोटो शेअर करण्यात आला. या फोटोमध्ये तिने गुलाबी रंगाचा नाईट ड्रेस आणि त्यावर राखाडी रंगाचं जॅकेट परिधान केलं होतं. मात्र, तिच्या ड्रेसवरील एका ओळीने सर्वांची उत्सुकता वाढवली. त्या टी-शर्टवर इंग्रजीमध्ये लिहिलं होतं, "If lost, please return to Shikhar Pahariya", म्हणजेच "जर मी हरवले, तर कृपया मला शिखर पहाडिया यांच्याकडे परत करा." हा संदेश पाहून सोशल मीडियावर चाहत्यांनी आनंद व्यक्त केला. अनेकांनी ही प्रेम व्यक्त करण्याची खूपच गोंडस आणि वेगळी पद्धत असल्याचं म्हटलं. काहींनी हार्ट इमोजी पोस्ट केले, तर काहींनी या जोडीचं कौतुक केलं. जान्हवी आणि शिखर अनेक वर्षांपासून एकमेकांना डेट करत असल्याची चर्चा आहे. दोघे अनेकदा एकत्र प्रवास करताना, धार्मिक स्थळांना भेट देताना आणि विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी होताना दिसले आहेत. गेल्या वर्षी 'कान्स फिल्म फेस्टिव्हल'दरम्यानही शिखर जान्हवीसोबत दिसला होता. याआधीही जान्हवीने शिखरबद्दलचं प्रेम वेगवेगळ्या प्रकारे व्यक्त केलं होतं. काही दिवसांपूर्वी तिने शिखरच्या नावाचं पेंडंट असलेला नेकलेस परिधान केला होता. आता नाईट ड्रेसवरील या खास संदेशामुळे पुन्हा एकदा त्यांच्या नात्याची चर्चा रंगली आहे. दरम्यान, जान्हवी कपूरच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास, तिचा आणि दक्षिणात्य सुपरस्टार राम चरण यांचा बहुचर्चित 'पेड्डी' चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला आहे.

# समांथाचा बॉक्स ऑफिसवर धडाका!



दाक्षिणात्य अभिनेत्री समांथा रुथ प्रभु हिचा बहुचर्चित 'मां इंटी बंगाराम' हा चित्रपट सध्या बॉक्स ऑफिसवर जबरदस्त कामगिरी करत आहे. महिला-केंद्रित कथानक असलेल्या या ॲक्शन-कॉमेडी चित्रपटाला प्रेक्षकांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर अवघ्या दोन दिवसांतच त्याने अनेक विक्रम आपल्या नावावर केले आहेत. समांथाचा हा चित्रपट प्रेक्षकांना खूप आवडत असून, विशेषतः तिच्या दमदार अभिनयाची आणि ॲक्शन अवताराची सर्वत्र चर्चा होत आहे. चांगली कथा, मनोरंजन आणि समांथाचा प्रभावी अभिनय यामुळे चित्रपटाची लोकप्रियता झपाट्याने वाढताना दिसत आहे. बॉक्स ऑफिस अहवालानुसार, 'मां इंटी बंगाराम'ने प्रदर्शनाच्या दुसऱ्या दिवशी तब्बल ७.५० कोटी रुपयांची कमाई केली आहे. पहिल्या दिवशी चित्रपटाने ५.३५ कोटी रुपयांचा गल्ला जमवला होता. त्यामुळे केवळ दोन दिवसांत चित्रपटाची एकूण नेट कमाई १२.८५ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. चित्रपटाचे ग्रॉस कलेक्शन म्हणजेच एकूण कमाई १४.९० कोटी रुपये झाली आहे. दुसऱ्या दिवशी चित्रपटाचे सुमारे २५९१ शो दाखवण्यात आले होते आणि थिएटरमधील प्रेक्षकांची उपस्थिती म्हणजेच ऑक्युपन्सी ४४.६ टक्के इतकी नोंदवण्यात आली. फक्त भारतातच नाही, तर परदेशातही या चित्रपटाला मोठा प्रतिसाद मिळत आहे. विदेशी बाजारपेठेत चित्रपटाने आतापर्यंत १०.६० कोटी रुपयांची कमाई केली आहे. त्यामुळे चित्रपटाचे जागतिक स्तरावरील एकूण कलेक्शन २५.५० कोटी रुपयांपर्यंत पोहोचले आहे.

# भारताच्या लेकी लई हुशार!

## महिला संघाने आशियाई रिले चॅम्पियनशिप स्पर्धेत पटकावलं सुवर्णपदक

**महाईन्यूज** । नवी दिल्ली

**एशियन रिले चॅम्पियनशिप्स २०२६ मध्ये भारतीय महिला संघाने सुवर्णपदकाला गवसणी घातली. ४x१०० मीटर स्पर्धेत भारताच्या महिला संघाने उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक जिंकलं. अंतिम फेरीत भारतीय संघाने चीनचा पराभव केला आणि ४३.८५ सेकंदांची हंगामातील सर्वोत्तम वेळ नोंदवली. या स्पर्धेत भारताने एकूण तीन पदकं एक सुवर्ण, एक रौप्य आणि एक कांस्य जिंकली.**




या संघात श्राबनी नंदा, एस.एस. स्नेहा, सुदेशना शिवंकर आणि तमन्ना यांचा समावेश होता. या चौघींनी शर्यतीदरम्यान अचूक बॅटनची देवाणघेवाण आणि उत्कृष्ट अंतिम गती दाखवली. भारताने ४३.८५ सेकंदांची वेळ नोंदवत प्रथम क्रमांक पटकावला. या शर्यतीत चीनच्या संघाने ४४.०९ सेकंदांची वेळ घेत रौप्यपदक जिंकले आणि दुसरे स्थान मिळवले, तर थायलंडने ४४.११ सेकंदांच्या वेळेसह कांस्यपदक जिंकले. रिलायन्स फाउंडेशनचे प्रशिक्षक मार्टिन ओवेन्स यांच्या मार्गदर्शनाखाली संघाने शर्यतीचं नियोजन यशस्वीपणे अंमलात आणलं.

या स्पर्धेत तमन्ना आणि स्नेहा शानुवल्ली यांनी भारतासाठी उत्कृष्ट वैयक्तिक कामगिरी करत प्रत्येकी दोन पदकं जिंकली. महिलांच्या ४X१०० मीटर शर्यतीत सुवर्णपदक जिंकण्यापूर्वी, या दोन्ही खेळाडूंनी मिश्र ४X१०० मीटर रिले शर्यतीतही देशासाठी कांस्यपदक मिळवलं होतं. या मिश्र संघात त्यांच्यासोबत अनिमेश कुजूर आणि प्रणव गुरव यांचाही समावेश होता; या चौघांनी ४१.२७ सेकंदांची वेळ नोंदवत तिसरं स्थान पटकावलं. या शर्यतीत थायलंडने (४१.१४ सेकंद) प्रथम, तर चीनने (४१.२९ सेकंद) दुसरे स्थान मिळवले.

कझाकिस्तानने ३:१६.७५ इतक्या वेळेसह सुवर्णपदक जिंकलं, तर यजमान चीनने ३:१७.२० वेळेसह तिसरं स्थान पटकावलं. आशियाई रिले चॅम्पियनशिपमधील ४X४०० मीटर मिश्र रिले प्रकारातील भारताचं हे दुसरे पदक आहे. यापूर्वी, २०२४ मध्ये झालेल्या या स्पर्धेच्या पहिल्याच आवृत्तीत भारताने राष्ट्रीय विक्रमासह सुवर्णपदक पटकावलं होतं. भारताचा सध्याचा राष्ट्रीय विक्रम ३:१२.८७ इतका आहे; हा विक्रम २०२४ च्या 'नॅशनल इंटर-स्टेट ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप'मध्ये मोहम्मद अनस, ज्योतिका दांडी, मोहम्मद अजमल आणि किरण पहल यांच्या संघाने नोंदवला होता.

### मिक्स्ड रिलेत रौप्यपदक

भारतीय संघाने दमदार कामगिरी करत ४X४०० मीटर मिश्र रिलेमध्ये रौप्य पदक आणि ४X१०० मीटर मिश्र रिलेमध्ये कांस्य पदक जिंकलं. ४X४०० मीटर मिश्र रिलेमध्ये, ऑलिंपियन एम.आर. पूवम्मा, नीरू पाठक, तीर्थेश पी. शेट्टी आणि भरत श्रीधर यांचा समावेश असलेल्या भारतीय संघाने ३:१७.०६ अशी वेळ नोंदवली. भारतीय संघाने दुसरं स्थान पटकावत रौप्य पदक जिंकलं.

## क्रिकेट आणि मातृत्व दोन्ही सांभाळता येणार! ICCचा ऐतिहासिक निर्णय

**महाईन्यूज** । नवी दिल्ली

**आयसीसीने महिला क्रिकेटच्या इतिहासात ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. महिला क्रिकेटपटूंना मातृत्वानंतर पुन्हा व्यावसायिक क्रिकेटमध्ये पुनरागमन करणं अधिक सुलभ व्हावं यासाठी आयसीसीने (ICC) 'रिटर्न टू प्ले पोस्ट-प्रेग्नन्सी गाईडलाइन्स' जाहीर केल्या आहेत. संशोधन आणि वैद्यकीय तज्ज्ञांच्या मार्गदर्शनावर आधारित या मार्गदर्शक तत्त्वांद्वारे प्रसूतीनंतर महिला खेळाडूंना सुरक्षित, नियोजित आणि टप्प्याटप्प्याने स्पर्धात्मक क्रिकेटमध्ये परतण्यास मदत केली जाणार आहे.**



International Cricket Council

महिला क्रिकेटचं प्रस्थ वाढत असताना आणि करिअरच्या संधी तयार होत असताना अनेक महिला खेळाडू आपल्या कारकिर्दीदरम्यान मुल जन्माला घालण्याचा निर्णय घेतात. तसेच मातृत्वानंतर पुन्हा उच्चस्तरीय क्रिकेटमध्ये पुनरागमन करण्याकडे त्यांचा कल वाढत आहे. या संपूर्ण प्रक्रियेला मदत करण्यासाठी आयसीसीने ही मार्गदर्शक तत्त्वे तयार केली असून, महिला क्रिकेटच्या सातत्यपूर्ण विकासासोबतच खेळाडूंच्या आरोग्य आणि कल्याणासाठी असलेल्या व्यापक बांधिलकीचाही हा एक भाग आहे.

महिला क्रिकेटपटूंचे आरोग्य हे आयसीसीच्या महिला क्रिकेटविषयक धोरणातील महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. महिला क्रिकेटचा विकास हा आयसीसीच्या सहा प्रमुख धोरणात्मक प्राधान्यक्रमांपैकी एक आहे. याच दृष्टिकोनातून आयसीसीने '१००% क्रिकेट' मोहिमेअंतर्गत महिलांच्या आरोग्याशी संबंधित विविध उपक्रम राबवले आहेत. या उपक्रमांद्वारे खेळाडू आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांना माहिती देणं, जागरूकता वाढवणं आणि क्रीडा क्षेत्रात महिलांच्या आरोग्याशी संबंधित महत्त्वाच्या विषयांवर खुलेपणाने चर्चा होण्यास प्रोत्साहन देणं, हा उद्देश आहे.

'रिटर्न टू प्ले पोस्ट-प्रेग्नन्सी गाईडलाइन्स' सदस्य देशांच्या क्रिकेट मंडळांना त्यांच्या स्थानिक कायद्यांनुसार गर्भधारणा आणि पुनरागमन धोरण तयार करण्यास मदत करतील. यामध्ये खेळाडूंच्या शारीरिक, मानसिक आणि व्यावहारिक गरजांचा विचार करून त्यांना आवश्यक मार्गदर्शन व सहाय्य उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्यात आला आहे.

महिला क्रिकेटपटूंना क्रिकेटमध्ये पुनरागमन करता यावं यासाठी या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये '6 आर फ्रेमवर्क' मांडण्यात आलं आहे. यामध्ये रेडी (Ready), रिव्ह्यू (Review), रिस्टोर (Restore), रिकंडिशन (Recondition), रिटर्न (Return) आणि रिफाइन (Refine) या सहा टप्प्यांचा समावेश आहे.

या प्रक्रियेत बाळंतपणानंतरची सुरुवातीची शारीरिक रिकव्हरी, वैद्यकीय आणि आरोग्यविषयक तपासण्या, टप्प्याटप्प्याने प्रशिक्षणाकडे पुनरागमन, क्रिकेटसाठी आवश्यक शारीरिक तयारी, स्पर्धात्मक क्रिकेटमध्ये पुनरागमन तसेच खेळाडू पुन्हा क्रिकेटच्या वातावरणात दाखल झाल्यानंतर तिच्या आरोग्य आणि कामगिरीवर सातत्याने लक्ष ठेवणं अशा सर्व महत्त्वाच्या बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

स्मार्ट PCMC
SMART CITY
epaper.mahaenews.com
महाईन्यूज ™
ePaper
। मंगळवार ।
दि. 23 जून 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# जीवनवाहिन्या की मृत्यूचे सापळे?

महाईन्यूज ।
पिंपरी- चिंचवड


पिंपरी-चिंचवड शहरातील पवना, इंद्रायणी आणि मुळा या जीवनदायी नद्या सध्या गंभीर प्रदूषणाच्या विळख्यात अडकल्या असून, दररोज निर्माण होणाऱ्या सुमारे एक हजार दशलक्ष लिटर (एमएलडी) सांडपाण्यापैकी तब्बल ६०० एमएलडी मैलापाणी कोणतीही प्रक्रिया न करता थेट नदीपात्रात सोडले जात असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. महापालिकेकडून केवळ ४०० एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया होत असल्याने नद्यांचे प्रदूषण दिवसेंदिवस वाढत आहे.

महापालिका पवना नदीतून दररोज ५५० एमएलडी, एमआयडीसीमार्फत ३० एमएलडी आणि आंद्रा पाणी योजनेतून इंद्रायणी नदीतून १०० एमएलडी असे एकूण ६८० एमएलडी पाणी शहराला पुरवते. याशिवाय विहिरी, बोअरवेल, खासगी टँकर आणि पुनर्वापरित पाण्याचा वापर मिळून शहरात दररोज सुमारे एक हजार एमएलडी पाण्याचा वापर होतो. त्यातून तेवढ्याच प्रमाणात सांडपाणी तयार होते.

महापालिकेकडे शहरभरात २२ सांडपाणी शुद्धीकरण केंद्रे (एसटीपी) असून त्यांची एकूण क्षमता ४२३ एमएलडी आहे. प्रत्यक्षात दररोज सुमारे ४०० एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया होत असल्याचा दावा प्रशासनाने केला आहे. त्यामुळे उर्वरित ६०० एमएलडी सांडपाणी प्रक्रिया न होताच नद्यांमध्ये मिसळत असल्याचे स्पष्ट होत आहे. अनेक ठिकाणी ड्रेनेज लाईन फुटल्याने किंवा त्यांची योग्य देखभाल न झाल्याने सांडपाणी नाले आणि रस्त्यांमार्फत थेट नदीपात्रात जात आहे. नदीकाठावरील काही ड्रेनेज लाईन जाणीवपूर्वक फोडल्या जात असल्याचा आरोप पर्यावरणप्रेमींनी केला आहे. तसेच, काही एसटीपीमधून रात्रीच्या वेळी प्रक्रिया न केलेले सांडपाणी थेट नदीत सोडले जात असल्याच्या तक्रारीही सातत्याने होत आहेत. या प्रदूषणामुळे नदीपात्रात जलपर्णीचा प्रचंड फैलाव झाला असून पाण्यातून दुर्गंधी येत आहे. अनेक ठिकाणी पांढरा फेस तयार होत असून मासेमृत्यूच्या घटनाही वाढल्या आहेत. नदीकाठच्या परिसरात डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढल्याने नागरिकांच्या आरोग्याचाही प्रश्न गंभीर बनला आहे.

> "शहरातील वाढत्या सांडपाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी टप्प्याटप्प्याने उपाययोजना सुरू आहेत. २० एमएलडी क्षमतेचे नवीन एसटीपी उभारण्याचे काम सुरू असून, भविष्यात ४३५ एमएलडी क्षमतेची १२ नवीन शुद्धीकरण केंद्रे उभारण्यात येणार आहेत. प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर वाढविण्यासाठीही महापालिका प्रयत्नशील असून, नदी प्रदूषण कमी करण्यासाठी जलपर्णी हटविणे, पुनर्चक्रिकरण प्रकल्प आणि सांडपाणी व्यवस्थापनावर विशेष भर दिला जात आहे."
>
> - संजय कुलकर्णी, मुख्य अभियंता





# झिरो वेस्ट उपक्रमाला नागरिकांचा प्रतिसाद!

## पर्यावरणपूरक कचरा व्यवस्थापनाला चालना; ११.४७ टन कचऱ्याचे विलगीकरण

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**कचरा व्यवस्थापनात नागरिकांच्या सहभागातून सकारात्मक बदल घडत असल्याचे चित्र पिंपरी चिंचवड शहरात दिसून येत आहे. महापालिकेच्या शून्य कचरा संकलन (झिरो वेस्ट स्लम) उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून गेल्या महिनाभरात ११.४७ टन कचऱ्याचे स्रोतस्तरावर विलगीकरण करण्यात आले आहे. या उपक्रमात १९ हजार ८०५ घरांनी सहभाग नोंदविला आहे.**



महापालिकेच्या आकडेवारीनुसार, महिनाभरात कालावधीत ९.९७ टन ओला कचरा आणि १.५० टन सुका कचरा स्वतंत्रपणे संकलित करण्यात आला. याशिवाय, ६४३ किलो सॅनिटरी कचऱ्याचे सुरक्षित पद्धतीने व्यवस्थापन करण्यात आले. कचऱ्याच्या वर्गीकरणामुळे पुनर्वापर आणि पुनर्निर्मिती प्रक्रियेला गती मिळत असून, पर्यावरणीय परिणाम कमी करण्यास मदत होत आहे.

कचरा डेपोवरील वाढता ताण कमी करण्यासाठी आणि पर्यावरणपूरक कचरा व्यवस्थापनाला चालना देण्यासाठी महापालिकेकडून शून्य कचरा संकल्पना राबविण्यात येत आहे. घराघरांत ओला, सुका, सॅनिटरी आणि विशेष काळजीयोग्य कचरा वेगळा करण्याची सवय वाढत असल्याने कचऱ्याच्या वैज्ञानिक व्यवस्थापनाला बळ मिळत आहे.

याबाबत महापौर रवि लांडगे म्हणाले, शून्य कचरा संकलन उपक्रमाला मिळणारा नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद ही पिंपरी चिंचवडकरांच्या पर्यावरणाप्रती असलेल्या बांधिलकीची साक्ष आहे. स्रोतस्तरावर कचऱ्याचे विलगीकरण केल्यास कचऱ्याचे प्रमाण कमी होण्याबरोबरच पुनर्वापर आणि पुनर्निर्मितीलाही चालना मिळते. स्वच्छ, सुंदर आणि शाश्वत शहर घडविण्यासाठी प्रत्येक नागरिकाने कचरा विलगीकरणाची सवय कायम ठेवावी.

अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम म्हणाले, कचरा व्यवस्थापनामध्ये नागरिकांचा सहभाग हा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. झिरो वेस्ट स्लम उपक्रमामुळे कचऱ्याचे स्रोतस्तरावर वर्गीकरण वाढत असून, कचरा संकलन आणि प्रक्रियेमध्ये कार्यक्षमता निर्माण होत आहे. नागरिकांनी या उपक्रमात अधिकाधिक सहभागी होऊन शहराच्या स्वच्छता चळवळीला बळ द्यावे.

कचऱ्याचे योग्य प्रकारे विलगीकरण केल्यास त्याचा पुनर्वापर, पुनर्निर्मिती आणि सुरक्षित विल्हेवाट लावणे अधिक सुलभ होते. ओला कचरा कंपोस्ट निर्मितीसाठी, तर सुका कचरा पुनर्वापरासाठी उपयुक्त ठरतो. त्यामुळे प्रत्येक घरातून चार प्रकारांत कचरा विलगीकरण होणे ही काळाची गरज आहे, असे मत उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी व्यक्त केले.



❝ शहर स्वच्छ, सुंदर आणि शाश्वत ठेवण्यासाठी नागरिकांनी ओला, सुका, सॅनिटरी आणि विशेष काळजीयोग्य कचरा अशा चार प्रकारांत कचरा विलगीकरणाची सवय कायम ठेवावी. नागरिकांचा वाढता सहभाग ही या उपक्रमाची जमेची बाजू ठरत असून, 'माझा कचरा, माझी जबाबदारी' ही संकल्पना अधिक बळकट होत आहे.

**- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

# शालेय स्तरापासून योगाचे धडे देणे काळाची गरज; आमदार शंकर जगताप

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**"शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्यासाठी योगाभ्यास ही भारताने जगाला दिलेली अमूल्य देणगी आहे. आजच्या गतिमान युगात लहान वयातच मुलांमध्ये शारीरिक व मानसिक ताणतणाव वाढताना दिसत आहेत. भविष्यातील आरोग्याची गुंतागुंत प्राथमिक स्तरावरच रोखायची असेल, तर शालेय शिक्षणापासूनच मुलांना योगाचे धडे देणे अत्यंत आवश्यक आहे," असे प्रतिपादन आमदार शंकर जगताप यांनी केले.**




आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त सांगवी-पिंपळे गुरव मंडल अंतर्गत रविवारी (दि. २१) राजमाता जिजाऊ उद्यान येथे भव्य योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात आमदार शंकर जगताप यांनी स्वतः उपस्थित राहून नागरिकांसोबत योगासने केली.

कार्यक्रमात बोलताना आमदार जगताप म्हणाले की, "देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अथक प्रयत्नांमुळे योगाला आज जागतिक स्तरावर एक नवी आणि जाज्वल्य ओळख मिळाली आहे. यंदाचा योग दिन '१२ वर्षे जनसेवेची, जनकल्याणाची' या संकल्पनेने साजरा होत आहे. महाराष्ट्रातही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली योग चळवळीला मोठी गती मिळाली आहे. फडणवीस यांच्या क्रीडा व आरोग्य धोरणांच्या माध्यमातून योग संस्कृती राज्यातील तळागाळातील नागरिकांपर्यंत यशस्वीपणे पोहोचली आहे."

भावी पिढी सुदृढ आणि निरोगी ठेवण्यासाठी शालेय स्तरावर योगाची मोठी जनजागृती होणे गरजेचे आहे. लहान वयातच योगाची सवय लागल्यास मुलांची एकाग्रता वाढेल आणि भविष्यात उद्भवणारे गंभीर आजार व आरोग्याची गुंतागुंत सुरुवातीलाच टाळता येईल, यावर आमदार जगताप यांनी विशेष भर दिला.

### नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

या शिबिराचे आयोजन नगरसेवक शशिकांत कदम, श्याम जगताप, ज्ञानेश्वर उर्फ माऊली जगताप, नगरसेविका पल्लवी महेश जगताप आणि यांनी केले होते. प्रसिद्ध योगशिक्षक मीना पवार यांनी उपस्थितांना प्राणायाम व विविध योगासनांचे प्रात्यक्षिकांसह शास्त्रशुद्ध मार्गदर्शन केले. परिसरातील शेकडो नागरिकांनी या शिबिराला उपस्थित राहून नियमित योगासने करण्याचा संकल्प केला.

# पाणीपुरवठा विभागाच्या निविदेत 'रिंग'चा संशय?

## नगरसेवक संदीप वाघेरे यांची चौकशी व निविदा रद्द करण्याची मागणी

**महाईन्यूज** । पिंपरी- चिंचवड

**शहरातील विविध पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांवरील वितरण व्यवस्थेचे परिचालन व देखभाल-दुरुस्ती करण्यासाठी पाणीपुरवठा विभागामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या निविदा सूचना क्र. पाणीपुरवठा/HO/2/39/2026-2027 व पाणीपुरवठा/HO/3/2/2026-2027 संदर्भात गंभीर आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. या निविदा प्रक्रियेतील अटी व शर्थींची सखोल चौकशी करून सदर निविदा रद्द करावी तसेच सुधारित अटींसह नव्याने निविदा प्रक्रिया राबवावी, अशी मागणी नगरसेवक संदीप वाघेरे यांच्या वतीने करण्यात आली आहे.**



निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, सदर निविदेतील अनेक अटींमध्ये विसंगती, तफावत तसेच स्पर्धाविरोधी स्वरूप आढळून येत आहे. काही अटी विशिष्ट ठेकेदार अथवा संस्थांना लाभदायक ठरतील अशा पद्धतीने तयार करण्यात आल्याचा प्रथमदर्शनी संशय व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे निविदा प्रक्रियेमध्ये अपेक्षित असलेली पारदर्शकता, समान संधी व निकोप स्पर्धा बाधित होण्याची शक्यता निर्माण झाली असून मर्यादित स्पर्धेमुळे 'रिंग' पद्धतीने निविदा प्रक्रिया पार पडण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

शासनाच्या धोरणानुसार सुशिक्षित बेरोजगार, स्वयंरोजगार गट, बेरोजगार सेवा सहकारी संस्था व लघु संस्थांना सार्वजनिक कामांमध्ये संधी मिळणे अपेक्षित असताना सदर निविदेमध्ये अशा घटकांच्या सहभागास अडथळा निर्माण करणाऱ्या जाचक अटींचा समावेश करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे अनेक पात्र संस्था निविदा प्रक्रियेपासून वंचित राहू शकतात, अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे, प्रत्यक्ष कामाचे स्वरूप हे व्हॉल्व ऑपरेशन, पाणीपुरवठा नियंत्रण, देखभाल व किरकोळ दुरुस्तीशी संबंधित असताना निविदेमध्ये "परिचालन" या व्यापक संज्ञेचा वापर करण्यात आला आहे. तसेच अकुशल कामगारांसाठीही अनुभव प्रमाणपत्राची सक्ती करण्यात आल्याने ही अट अव्यवहार्य व अन्यायकारक असल्याचा आक्षेप घेण्यात आला आहे.

महानगरपालिकेच्या कामकाजात पारदर्शकता, समान संधी आणि निकोप स्पर्धा अबाधित राहावी तसेच सार्वजनिक निधीचा कार्यक्षम व न्याय्य वापर व्हावा, या उद्देशाने प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

### संदीप वाघेरे यांच्या प्रमुख मागण्या कोणत्या?

- निविदेतील अटी व शर्थींची स्वतंत्र व सखोल चौकशी करण्यात यावी.
- निविदा अटी विशिष्ट ठेकेदारांना लाभदायक ठरत आहेत का याची पडताळणी करण्यात यावी.
- सुशिक्षित बेरोजगार, स्वयंरोजगार गट व सेवा सहकारी संस्थांवर अन्याय करणाऱ्या अटी रद्द करण्यात याव्यात.
- अकुशल कामगारांसाठी अनुभव प्रमाणपत्राची अट व इतर अव्यवहार्य अटी वगळण्यात याव्यात.
- "परिचालन" ऐवजी "व्हॉल्व ऑपरेशन व देखभाल-दुरुस्ती" अनुभव असलेल्या संस्थांना पात्रता देण्यात यावी.
- देखभाल-दुरुस्ती व मजूर पुरवठा या कामांचा स्वतंत्र अनुभव ग्राह्य धरण्यात यावा.
- विद्यमान निविदा प्रक्रिया स्थगित अथवा रद्द करून सुधारित व स्पर्धात्मक अटींसह नव्याने निविदा प्रसिद्ध करण्यात यावी.

# अशुद्ध पाणीपुरवठा करणाऱ्या टँकर चालकांवर कारवाई करा; खासदार बारणे

**महाईन्यूज** । पिंपरी- चिंचवड

**पिंपरी-चिंचवड शहरात टँकरने मोठ्या प्रमाणात पाणीपुरवठा केला जातो. टँकर चालक हे पाणी कोठून घेतात, ते पिण्यायोग्य आहे का याची चौकशी करावी. पैसे जास्त घेऊन सोसायटीधारकांना आर्थिक बुर्डंड टाकला जातो. सोसायटीधारकांची लूट थांबवावी. त्यासाठी टँकर चालकांवर निर्बंध आणावेत. त्यांची नोंद ठेवावी. स्वच्छ पाणी न दिल्यास टँकर चालकांवर कारवाई करण्याची सूचना शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी महापालिका प्रशासनाला केली आहे. तसेच इतर विकास कामांबाबत काटकसर करावी. पाणीपुरवठ्याच्या कामांवर भर देऊन ही कामे तत्काळ पूर्ण करावीत. याबाबत आयुक्त आणि महापौरांशीही चर्चा करणार असल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले.**




शहरात चार दिवसांपासून पाणी कपात करण्यात आली. विस्कळीत पाणीपुरवठ्याच्या तक्रारींमध्ये वाढ झाल्याने खासदार बारणे यांनी सोमवारी महापालिका अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेतली. अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, नागसेविक सुलभा उबाळे, ऐश्वर्या तरस, नगरसेवक निलेश तरस, राजेंद्र तरस, पाणीपुरवठा विभागाचे सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी, कार्यकारी अभियंता महेश बरिदे, विजयसिंह भोसले, सुनिल अहिरे, कनिष्ठ अभियंता अनिश ओक उपस्थित होते. दरम्यान, खासदार श्रीरंग बारणे यांनी गेल्या आठ वर्षात पवना धरणातील एक लाख क्युबिक मीटर गाळ काढल्याने दीड महिना पुरेल एवढा पाणीसाठा उपलब्ध झाला. एक टीएसी पाणीसाठा वाढला आहे. त्यामुळे उन्हाळ्यात पाण्याची तीव्र टंचाई जाणवली नाही. शासनाची कोणतीही मदत न घेता खासदार बारणे यांनी लोकसहभागातून हा गाळ काढला. अन्यथा गंभीर पाणी टंचाईला सामोरे जावे लागले असते.

खासदार बारणे म्हणाले, कमी दाबाने, अस्वच्छ पाणीपुरवठ्याच्या तक्रारींमध्ये वाढ झाली आहे. समान पाणीपुरवठा होत नाही. काही ठिकाणी जास्त, काही ठिकाणी कमी तर काही ठिकाणी पाणी येतच नाही. पाणी समान वाटपासाठी स्काडा प्रणाली बसविली. मीटर बदलले. जलवाहिनी बदललली. पाण्याच्या टाक्या सर्वाधिक उभारल्या. ३० टक्के पाणी गळती होत आहे. अनधिकृतपणे नळजोड घेतले जातात. ते रोखण्यात प्रशासनाला अपयश आले आहे. नियोजनशून्य कारभारामुळे पाणी समस्या कायम आहे. प्रशासन उशिरा जागे झाले आहे. पाणी काटकसरीचे नियोजन अगोदरच करणे अपेक्षित होते. पाणी बचतीचे वर्षभर नियोजन करावे. स्वच्छ पाणीपुरवठ्यासाठी आत्तापासूनच तयारी करावी. महापालिका अशुद्ध पाणी उपसा करित असलेला नदी पात्राचा परिसर अतिशय अस्वच्छ आहे. तेथील नदीपात्र स्वचछ करावे. मुळशी धरणातून अतिरिक्त सात टीएमसी पाणी आणण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करावा.

### एसटीपी चालू की बंद यावर देखरेख ठेवावी..

शहरातील ४९४ सोसायट्यांपैकी ३६९ सोसायट्यांमधील एसटीपी चालू आहेत. १२५ सोसायट्यांमधील एसटीपी बंद आहेत. सोसायट्यांमधील एसटीपी चालू आहेत की नाही यावर निगराणी ठेवावी. एसटीपीतील पाणी वाहने धुने, उद्यानासाठी वापरण्याकरिता नागरिकांना प्रोत्साहित करावे. जुन्या सोसायट्यांना एसटीपी उभारणे शक्य नाही. तिथे महापालिकेने लहान एसीटीपी उभारण्याचा प्रयत्न करावा, अशी सूचनाही खासदार बारणे यांनी केली.


Knowledge is Power
Dr. D. Y. Patil
Varale Campus
A World of Career Opportunities Awaits
Dr. SUSHANT PATIL
GROUP
A Journey towards, Innovation, Excellence, Growth & Success
शोध, नवोपक्रम, उत्कृष्टता आणि वाढीचा प्रवास.....
An Autonomous Institute - Affiliated to Savitribai Phule Pune University
POLYTECHNIC
Diploma
ENGINEERING
B. Tech | B.E.
MANAGEMENT
MBA | MCA
ARCHITECTURE
B. Arch | M. Arch
ADMISSIONS
OPEN 2026-27
Contact Us
93590 04652 | 76667 20378
76668 29653 | 78220 99218
www.dypcoei.edu.in | www.dypimed.edu.in | www.dypatiltcs.com | www.dypatilarch.com
1
KM
From Talegaon Railway
Station